VOLUME - X, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2021
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.399 (www.sjifactor.com) AP - 21

# ४. महात्मा गांधीजी आणि महिला सबलीकरण एक राजकीय विश्लेषण

**प्रा. डॉ. डोंगरे एल. बी.**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय, हिमायतनगर, जि. नांदेड (महाराष्ट्र)

महिला सबलीकरणाच्या युगात महात्मा गांधी यांचा जन्म म्हणजे जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी घटना म्हणावी लागेल. सत्य, अहिंसा, सत्याग्रह या साधनाद्वारे महिला सबलीकरणाचे कार्य केले. महात्मा गांधी पूर्वी राजाराम मोहनरॉय, महात्मा फुले, धोंडो केशव कर्वे, दयायानंद सरस्वती, राजर्षी शाहू महाराज या समाज सुधारकांनी महिलांच्या सबलीकरणा बाबत कार्य केलेले दिसून येते. 1920 नंतर महात्मा गांधी युगाची सुरूवात झाली. महिलांच्या तत्कालीन युगातील समस्यांमध्ये, लिंग भेद, सती प्रथा, दास प्रथा विविध अनिष्ठ चालीरिती त्यामध्ये स्त्री भ्रूणहत्या, बालविवाह इ. होत्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्त्रीयांना शारिरीक दृष्ट्या कमकुवत समजल्या गेले. महात्मा गांधी यांनी या घटकावर भर दिला. स्वातंत्र्य आंदोलनात मोठ्या प्रमाणात स्त्रीयांना सहभागी व नेतृत्त्वासाठी प्रोत्साहन-संधी दिली. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनामध्ये मोठ्या प्रमाणात स्त्रीयांनी सहभाग घेतलेला दिसून येतो. सरोजनी नायडु, मीरा बेन, मधुबेन, सुशीला नायर, आभाबेन, सरला बेन, चौधरी, श्रीमती राजकुमारी, अमृता कौर, विजयालक्ष्मी पंडीत अशा अनेक महिलांचे नेतृत्व पुढे आले. महिना अबला म्हनने हा स्त्री जातीचा अपमान आहे त्या बाबत महात्मा गांधी म्हणतात उन्हे अबला पुकारना महिलाओंकी आंतरिक शक्ती को दुष्कारना है | यदी हम इतिहासपर नजर डाले हमे उसकी बीरता की कई मिसाले मिलेंगी यदी महिलाएँ देश कि गरिमा बढाने का संकलप करके तो कुछ ही महिनों मे वे अपनी आध्यात्मीक अनुभुती के बल पर देश का रुप बदल सकती है |

15 सप्टेंबर 1921 मधील यंग इंडिया या वृत्तपत्रातील लेखात व्यक्ति जेव्हा वाईटासाठी जबाबदार आहे. त्यामध्ये सर्वात तुछ-हीन गोष्ट स्त्री जातीचा दुरूपयोग होय. खरी बाब हि कि, पुरूषांच्या मानसिकतेत आज देखील कोनत्याव प्रकारचे विशिष्ट असे परिवर्तन झालेले दिसुन येत नाही. पुरूषी अहंकाराने महिलांना केवळ उपभागोची वस्तु आणि गुलामच समजलेले आहे. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले कि, ते जर महिला असते तर पुरूषाद्वारे केल्या जानाऱ्या अत्याचाराला कधिच सहन केले नसते. स्त्री स्वातंत्र्याचे त्यांनीप्रखर शब्दात समर्थन केले. स्त्रीयांच्या साहस, धैर्य या घटकांना त्यांनी महत्त्व दिले त्यामुळे महाभारत वरामायन काळातील सिता व द्रोपती यांना महान मानले होते.

महिलांच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी समाजातील कनिष्ठ वर्गाबाबतच मध्यम वर्गातील समुदायातील आंदोलनावर भर दिला. त्यांच्या या कार्यामुळे मध्यम वर्गातूनच मोठ्या प्रमाणात महिला स्वातंत्र्याच्या चळवळींचा उदय झालेला दिसून येतो. 1920 असहयोग आंदोलन, मिठाचा सत्याग्रह, चलेजाव चळवळ-1942, वैयक्तिक सत्याग्रह अशा विविध आंदोलनामधुन महिला सबलीकरणाला बल मिळालेले दिसून येते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारतीय राज्यघटनेतील विविध कलमामध्ये स्त्रीयांच्या स्वातंत्र्याचा व अधिकाराचा उल्लेख मिळतो त्यामध्ये राज्याची नितिनिर्देशक तत्त्वे महत्त्वपूर्ण आहेत या घटकावर महात्मा गांधी

यांच्या विचारांचा जास्त प्रभाव दिसून येतो. यामुळेच शासनाला सामाजीक न्यायासाठी नुकसानकारी योजना बनवुन त्यांची अंमलबजावनी करावी लागली त्यामध्ये 1955 ला द्विभार्या प्रतिबंधक कायदा-यानुसार पहिली पत्नि जीवंत असतांना दुसरे लग्न एखाद्या पुरूषाने करणे शिक्षापात्र गुन्हा ठरतो. 1956 वारसा हक्क कायदा, 1955 हिंदु विवाह कायदा, 1961- हुंडाबंदी कायदा, 1956 वेश्या विरोधीकायदा, 1984 कुटूंब न्यायालयाची स्थापना, 1988-गर्भजल परिक्षाविरोध कायदा, 1990 महिला आयोगाची स्थापना, महिला कल्याण विभाग, 1994 पासून स्थानिक शासन व्यवस्थेत 33% आरक्षण, 2005 नागरीकायदा अशा विविध स्त्री कल्यानासाठी कायदे अस्तीत्त्वात आले त्यावर महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचाच प्रभाव होता. महात्मा गांधींच्या स्वच्छ भारत अभियाना प्रमाणेच महिला सबलीकरणाची कार्याची व्यापकता हि दिवसेंदिवस वाढत गेलेली दिसून येते. त्यामुळे महात्मा गांधी यांच्या कार्यामुळेच जगातील प्रसिद्ध शास्त्रज्ञ आईन्स्टाईन यांनी महात्मा गांधी यांच्याबदल म्हटले होते कि आने वाले पिढीयों का आदर्श तसेच सुभाष चंद्रबोस यांनी देखील महात्मा गांधी यांनी राष्ट्रपिता म्हणुन संबोधले होते.

प्रस्तुत शोधनिबंधात महात्मा गांधी यांनी भारतीय स्त्रीयांना पारंपारिक समाजातील दास्यते पासून मुक्त करण्यासाठी त्यांच्या समानतेचा व स्वातंत्र्याचा पुरस्कार केला त्यांच्या महिला सबलीकरणाच्या कार्यावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. यामध्ये म.गांधीजी पूर्व महिला सबलीकरणा बाबतचे कार्य, त्यांनी सद्यस्थितीत लोकसंख्या, त्यांची एकून सद्य काळातील स्त्री यावर एक दृष्टीक्षेप टाळण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**संशोधन समस्या**

महात्मा गांधीजी आणि महिला सबलीकरण एक राजकिय विश्लेषन हि संशोधन समस्या आहे.

**संशोधन पद्धती**

सामाजिक शास्त्रीय पद्धतीचा संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे. तसेच त्यासाठी विविध साधनांचा तंत्राचा वापर देखील करण्यात आलेला आहे.

**गृहित कृत्य**

1. भारतीय महिला सबलीकरणात महात्मा गांधी यांच्या विचारांना प्रभाव जानवतो.
2. महिलांच्या स्वातंत्र्या बाबत एक सुयोग्य कृतीशिल कार्यक्रमांचा अभाव दिसून येतो.
3. महिलांचा भारतीय राजकारणातील प्रवेश नगण्य प्रमाणात दिसून येतो.
4. शिक्षणाचा अभाव असल्यामुळे वंचीत वर्गातील महिलांचा राजकारणातील सहभाग अल्प प्रमाणात दिसून येतो.

**संशोधनाची उदिष्ट्ये**

1. महात्मा गांधी यांच्या महिला सबलीकरणाच्या राजकारणातील सहभागाचा आढावा घेणे.
2. महिलांच्या सामाजीक स्थीतीचा आढावा घेणे.
3. म.आर्थीक, सामाजीक, राजकीय, शैक्षणिक, स्थीती जाणुन घेणे तसेच आरोग्य स्थीतीची पाहणी करणे.

**महिला सबलीकरणाचा अर्थ**

स्त्रीयांना शिक्षणाच्या माध्यमातून पुरूषांच्या बरोबरीने समाजातील सर्वच क्षेत्रात विकासाची आणि प्रगतीची समानसंधी निर्माण करून देणारी प्रक्रिया होय.

**महिलांच्या राजकिय सबलीकरणाचे कार्य**

म. गांधी यांनी राजकारणात महिला नेतृत्त्वाचे समर्थन, 1921 ला झालेल्या महिलांना मतदानाच्या अधिकाराच्या मागणीने केलेले. संपूर्ण मानववाच्या कल्यानामध्ये महत्वपूर्ण भुमिका स्त्रीच पार पाडू शकतात महिला पुरूषांच्या तुलनेत अधिक सुहृदय आणि सुदृढं असतात त्यामुळे नैतिक राजकारणाला बळ मिळते. नैतिकतेमुळे शासनातील भ्रष्टाचाराला आळा बसतो असे महात्मा गांधींचे म्हणने होते.

अहिंसा आणि सत्याग्रह हे राजकारणाला शुद्ध बनविण्याचे शस्त्र मानले या तत्त्वाची प्रेरणा त्यांना त्यांची आई व पत्नी कस्तुरबा गांधी यांच्याकडून मिळाली. महिलांना अधिक शक्तिशाली बनविण्याची सुरूवात हि त्यांच्या परिवारापासूनच होत असते. नाकारण्या सारखे आहे. असे ते म्हणते. भेदभावामुक्त समान निर्मीतीवर त्यांचा भर होता त्यांना स्त्रीपुरूष समानतेवर अधिक भर दिला त्यामुळेच घटनेमध्ये मुलभूत अधिकारात समानतेचा अधिकाराचा समावेश दिसून येतो.

एका महिलेने महात्मा गांधी यांना पत्र पाठविलेले त्यामध्ये तिने लिहले होते. आत्मरक्षा आणि अहिंसा यावर प्रश्न मांडले त्यावर महात्मा गांधी म्हणाले जब भी स्त्री के साध्य दुर्व्यवहार की घटना हो तो हिंसा-अहिंसा का विचार न करे

महिलांच्या आर्थिक स्वावलंबनावर त्यांनी भर दिला. महिला बाहेर जाऊन काम धंदे करू शकत नसल्यामुळे त्यांनी घरी राहून देखील चरखा लावून उत्पन्न वाढविण्यावर त्यांनी लक्ष केंद्रीत केले. खादी उद्योगामुळे गाव, कस्बे व शहरामधील लाखो निर्धन महिलांना देश सेवेबरोबरच रोजगार देखील मिळाला त्यांचे जीवन सुखी बनले.

राजकारण हे पुरूष प्रधान आहे. राजकिय क्षेत्रात स्त्रीयांच्या कमी सहभागामुळे त्यांच्या राजकिय व कुठल्याच आशा आकांक्षांना मार्ग मिळत नाही. संपूर्ण भारतामध्ये राजकिय परिस्थिती स्त्रीयांसाठी अनुकुल नाही. अशा परिस्थितीमध्ये एखाद्या महिलेच्या जागा मिळवायचे असेल तर त्यासाठी केवळ आरक्षण मिळने हाच एक मार्ग होऊ शकत नाही. त्यासाठी स्वच्छ नैतिक दृष्टी असायला हवी असे महात्मा गांधी यांनी खालील घटकांवर भर दिला.

**1. शिक्षण**

महिलांचे सबलीकरण हे कवळ वरवरच्या उपाययोजना करून होणार नाही याकरिता मुलींना लहानपणोच प्राथमिक शिक्षणापासूनच तयारी करणे गरजेचे आहे. उच्च शिक्षण हे स्त्रीयांसाठी महत्त्वपुर्ण मानले केवळ पुस्तकी शिक्षण न देता कौशल्य विकास वर देखील भर देण्यात यावा असे महात्मा गांधीयांचे मत होते. मुलींचा शिक्षणात सहभाग वाढावा या करिता ठोस उपाययोजना करावी असे त्यांचे म्हणने होते.

**2. आत्मनिर्भता**

महिलांना खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनविने आजच्या काळाची गरज आहे. जागतिकीकरणाच्या युगामध्ये देशहितासाठी 50% क्रयशक्तिचा उपयोग हा गरजेचा आहे. यासाठी महात्मा गांधी यांनी कौशल्य विकासावर अधिक भर दिला एक सक्षम महिला नागरिक बनविने गरजेचे आहे. याकरिता त्यांना आपले निर्णय वैयक्तिक पातळीवर संपूर्ण आत्मविश्वासाने घेता यावेत.

**3. राजकिय सहभाग वाढविने**

प्राचीन काळापासूनच राजकिय क्षेत्रातील महत्त्वाच्या पदावर पुरूषांची मक्तेदारी होती. हिंदुस्थानच्या राजकिय क्षितीजावर महिलांचा सहभाग कमी होता. यामुळे राजकारणात पुरूष वर्गाकडुन महिलांच्या विविध समस्याकडे जेवढे गांभीर्याने पाहिले पाहीजेत हो त्याप्रमाणे पाहीले गेले नसल्यामुळे महिलांचा अपेक्षीत विकास झालेला नाही त्याकरिता महिलांना राजकिय क्षेत्रात व निर्णय प्रक्रियेत सहभाग वाढविने आवश्यक आहे त्यामुळे च म.गांधीची स्वातंत्र्य आंदोलनात महिलांना नेतृत्त्व काढण्याची संधी दिली. राजकिय संस्कृती निर्मीतीची गरज आहे.

**4. अनिष्ठ समाजिक परंपरा**

महात्मा गांधी स्त्रीयांच्या सामाजीक विकासाबाबत चिंतीत होते. महिलांच्या जीवनाला प्रभावीत करणाऱ्या समाजातील विविध अनिष्ठ प्रथा-परंपरा बदल वाईट वाटत होते. ते म्हणतात बाल विवाह, पडदापद्धत, सतीप्रथा-विधवा विवाह या अनिष्ठ प्रथामुळेच महिलांचा विकास होऊ शकलेला नाही. पतीचा होणारा अत्याचार -शोषण सहन करण्याची परंपरा समाजामध्ये पडलेली आहे. याप्रथांचे अन्मुलन करण्यासाठी त्यांनी केवळ संघटीत आंदोलनच केलेले नाही तर विविध परिषदा संम्मेलनातील व्याख्यानामध्ये व वर्तमानपत्रात लेखहिल्याचे दिसून येतात.

वैयक्तीक स्वातंत्र्य, त्यांना सन्मानाने वागणुक देणे यावर महात्मागांधी भर होता.

**शैक्षणिक जागृतीचा अभाव**

म.गांधी म्हणतात शिक्षणाच्या अभावामुळे महिलांना आपल्याला मिळालेल्या अधिकारांच्या जागृतीचा अभाव आहे. त्यामुळेच निरक्षरतेचे प्रमाण महिलामध्ये अधिक आहे. निरक्षरतेमुळेच राजकारणातील व प्रशासनातील महिलांचा सहभाग हा नगण्य आहे. महिलांना सबल करून त्यांना पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात समान अधिकार उपलब्ध करून देणे हे महिला सबलीकरणाचे प्रमुख हेतु आहे जगातील सर्वच देशात व सर्वच काळात कमी जास्त प्रमाणात लिंगभेदावर आधारित विषमतेमधून महिलांचे मोठ्याप्रमाणात शोषन झालेले दिसून येते.

त्यामुळे हि अन्यायकारक असलेली व्यवस्था बदलुन पुरूषांच्या बरोबरीने प्रगती आणि विकासाच्या समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण करणे काळाची गरज आहे.

**निष्कर्ष**

**स्त्री-पुरूष समानता**

भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात वर्षानुवर्षे स्त्रीयांना पुरूषापेक्षा कनिष्ठ स्थान दिलेले आहे. सामाजीक, धार्मिक, आर्थीक, राजकीय, शैक्षणिक पुरूषांचे वर्चस्व आढळुन येते. यामुळे पुरूषप्रधान संस्कृतीतील लिंगभेदावर आधारित स्त्रीयांच्या आधारित व्यवस्था निर्माण करण्यासाठी स्त्रीवादी संघटना कार्यशील बनलेल्या आहेत.

स्त्रीयांना न्याय मिळवून देने पारंपारिक रुढी परंपरा त्यामुळे अज्ञानाचे साम्राज्य असलेल्या समाजामध्ये स्त्रीयांना अनेकवर्ष अन्याय झाला. पुरूषप्रधान संस्कृती असल्यामुळे हजारोवर्षापासून महिलांवर अन्याय अत्याचार केले.

**संदर्भ ग्रंथ सुची**

1. पाटील हेमलता - स्त्रीयांची आर्थीक व सामाजिक स्थीती, गोदा प्रकाशन, औरंगाबाद
2. म.गांधी - मेरे सत्य के प्रयोग
3. खंडाळे चंद्रकांत - ग्रामीण समाजशास्त्र सौ.माया देवी खंडागळे, प्रकाशन, सांगली 2005
4. डॉ.गोरे- गव्हाने शुभांगी-महिला सबलीकरण स्वल्प व समस्या, वरद पब्लिकेशन, औरंगाबाद.
5. डॉ.देवळाणकर शैलेंद्र- समकालीन जागतिक राजकारण, विद्याबुक पब्लिकेशन 2005
6. लोकसत्ता वृत्तपत्र
7. हिंदुस्थान टाईम्स
8. द हिंदू
9. योजना मासिक